आयुक्त कार्यालय
सोलापूर महानगरपालिका
इंद्रभुवन, रेल्वे लाईन, सोलापूर.४१३००१
दुरध्वनी -०२१७-२७४०३००
जा.क्र./नआ/वै/६८६
दि.२५ डिसेंबर २०२१

---

## -: आदेश :-

**विषय: कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रणकामी सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी आदेश व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ:**

१) भारतीय साथ रोग अधिनियम १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब)
३) महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०.
४) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २७/११/२०२१ रोजीचे आदेश.
५) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २४/१२/२०२१ रोजीचे आदेश.

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.१४ मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे, आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून, महानगरपालिका आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, युरोप तसेच युएसएमध्ये ओमायक्रॉन कोविड -१९ व्हेरियंटमुळे रुग्णसंख्या दुप्पट वेगाने वाढत आहे. जगातील ११० देशामध्ये ओमायक्रॉनचा प्रसार झाला आहे. या विषाणुच्या प्रसाराचा वेग जास्त असल्याने व पुढील काळात त्याचा प्रसार जास्त होण्याची शक्यता असल्याने तसेच राज्यात देखील गेल्या दोन दिवसांत एक हजारपेक्षा जास्त रुग्ण दिसून येत आहेत. खिसमस उत्सव, लग्न समारंभ, नविन वर्षाचे स्वागत यामुळे गर्दी वाढून संसर्गाचा धोका वाढण्याची मोठी शक्यता असल्याने आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ प्रमाणे संपूर्ण राज्यात काही अतिरीक्त निर्बंध लावण्याचे शासनाने निर्देशीत केलेली आहे.

ज्याअर्थी, शासनाकडील वाचा क्र.५ मधील दि.२४/१२/२०२१ नुसार कोविड १९ विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी शासनाने सर्व प्रकारच्या समारंभामध्ये उपस्थितांच्या संख्येवर निर्बंध लागू केलेले आहेत.

त्याअर्थी, मी पि.शिवशंकर,भा.प्र.से., आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडील प्राप्त निर्देशास अनुसरुन सोलापूर शहर हद्दीत दि.२५/१२/२०२१ चे रात्री ००.०० पासून खालीलप्रमाणे निर्बंध लागू राहतील.

१) नाताळ सणाच्या अनुषंगाने शासन गृह विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.आरएलपी-१२२१/प्र.क्र. २८०/विशा-१ब दि.२३/१२/२०२१ अन्वये दिलेले निर्देश लागू राहतील.

२) लग्न संमारंभासाठी बंदीस्त सभागृहामध्ये एकावेळी उपस्थितांची संख्या १०० च्या वर नसेल आणि खुल्या जागेत ही संख्या २५० च्या वर नसेल किंवा या जागेच्या क्षमतेच्य २५ टक्के यापैकी जे कमी असेल ते.

३) इतर सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रमांसाठी देखील उपस्थितांची संख्या बंदीस्त ठिकाणी १०० च्या वर नसेल आणि खुल्या जागेत ही संख्या २५० च्या वर नसेल किंवा जागेच्या क्षमतेच्या २५ टक्के यापैकी जे कमी असेल ते.

४) उपरोक्त नमूद कार्यक्रमांव्यतिरिक्त बंदीस्त ठिकाणी स्थायी स्वरुपाची बैठक व्यवस्था असलेल्या ठिकाणी संबंधीत प्राधिकरणाकडून अनुद्येय असलेल्या क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा जास्त नसेल तसेच ज्याठिकाणी स्थायी स्वरुपाची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी अनुद्येय असलेल्या क्षमतेच्या २५ टक्के क्षमतेपेक्षा जास्त नसेल इतक्या उपस्थितीस व खुल्या जागेत संबंधीत प्राधिकरणाकडून अनुद्येय असलेल्या क्षमतेच्या २५ टक्के क्षमतेपेक्षा जास्त नसेल इतक्या उपस्थितीस परवानगी असेल.

५) क्रिडा स्पर्धा, खेळांचे समारंभ यासाठी कार्यक्रम स्थळाच्या आसन क्षमतेच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती नसेल.

६) वरीलपैकी कोणत्याही प्रकारात न मोडणाऱ्या समारंभ किंवा एकत्र येण्याच्या कार्यक्रमात उपस्थितांची संख्या किती असावी याबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे निश्चित करतील. असे करताना दि.२७ नोव्हेंबर, २०२१ चे आपत्ती व्यवस्थापनाच्या आदेशाचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

७) उपहारगृहे, जीम, स्पा, चित्रपटगृहे, नाटयगृहे या ठिकाणी क्षमतेच्या ५० टक्के उपस्थिती राहील. या आस्थापना धारकांनी त्यांचे परवानानुसार अनुद्येय असलेली त्यांची संपूर्ण क्षमता तसेच ५० टक्के क्षमतेची संख्या जाहीर करावी लागेल.

८) संपूर्ण शहरातील सर्व सार्वजनिक ठिकाणी रात्री ०९.०० ते सकाळी ०६.०० यावेळेत पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई असेल.

९) सदर आदेशात स्पष्टपणे समावेश नसलेल्या उपक्रमांबाबत स्थानिक परिस्थितीनुसार अधिक निर्बंध लावणेस जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे निर्णय घेऊ शकतील. मात्र असे निर्णय घेण्यापूर्वी स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने याबाबतची पूर्व सूचना जाहीर करणे आवश्यक राहील.

१०) सदर आदेशामध्ये अंर्तभूत असलेले निर्बंध स्थानिक परिस्थीनुसार अधिक कठोर करावयाचे झाल्यास त्याबाबतचे अधिकार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास असतील.

११) सदर आदेशात नमूद केलेल्या निर्बंधाव्यतिरिक्त इतर विषयांबाबत शासनाकडील दिनांक २७.११.२०२१ नुसार निर्बंध लागू राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुध्द संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी / विभागीय अधिकारी व अधिनस्त कर्मचारी यांनी कारवाई करावी.

सदर आदेश दिनांक २५/१२/२०२१ रोजी रात्री ००.०० वाजलेपासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील.

**सदरचा आदेश आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.**

स्थळ :- सोलापूर
दिनांक:- २५/१२/२०२१

SOLAPUR MUNICIPAL COMMISSIONER OFFICE

**( पि.शिवशंकर, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका.**

प्रति,
१) अति.आयुक्त, सो.म.पा.
२) सर्व उपायुक्त, सो.म.पा.
३) सर्व सहा.आयुक्त, सो.म.पा.
४) सर्व वैद्यकीय अधिकारी / मुख्य वैद्यकीय अधिकारी सो.म.पा.
५) सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शहर हद्दीतील सर्व पोलिस ठाणे, सोलापूर.
६) सर्व खाते / शाखा प्रमुख, सोलापूर महानगरपालिका.
७) महानगरपालिका हद्दीतील सर्व शासकीय कार्यालय प्रमुख

प्रत :- माहितीस्तव सादर..
१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
२) मा.जिल्हाधिकारी,सोलापूर
३) मा.पोलीस आयुक्त,सोलापूर

प्रत :- जनसंपर्क अधिकारी,
सदरचा आदेशाची माहिती सर्व नागरिकांना होणेसाठी त्यास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.